MHST140013552019

दाखल करण्याची तारीख–१६.०७.२०१९
नोंद केल्याची तारीख – १६.०७.२०१९
निर्णय देण्याची तारीख – २२.०६.२०२६
कालावधी – ०६ वर्षे, ११ महिने, ०६ दिवस

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, फलटण, जि. सातारा यांचे न्यायालयात**
(पिठासीन अधिकारी श्रीमती जे.एस.खेडकर–गोयल)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७६९/२०१९** **नि.क्र.६७**

*१३८ परक्राम्य लेख अधिनियम १८८१ अंतर्गत*

**फिर्यादी पक्ष** : **श्री.विजयराव नामदेव गायकवाड**
वय – ४० वर्ष, व्यवसाय – शेती
रा.तरडगांव, ता. फलटण, जि. सातारा

**विधीज्ञ** : श्री.आर.ए.यादव

**विरुध्द**

**आरोपी** : **श्री. सुरेश शांताराम शिंदे**
वय – ३५ वर्ष, व्यवसाय– व्यापार
रा. शिंदेमाळ, तरडगांव, ता.फलटण, जि. सातारा

**विधीज्ञ** : श्री.जे.एम.मेटकरी

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | : | २५.११.२०१८ |
| फिर्यादीने आरोपीला पाठविलेल्या नोटीशीची तारीख | : | ०६.१०.२०१८ |
| आरोपीला नोटीस पोहोच पावतीवरुन मिळाल्याची तारीख | : | १०.१०.२०१८ |
| आरोपीचे प्रतिकथन नोंदविल्याची तारीख | : | १६.०१.२०२० |
| पुरावा सुरु केल्याची तारीख | : | १८.१२.२०२१ |
| न्यायानिर्णयासाठी ठेवल्याची तारीख | : | २२.०६.२०२६ |
| न्यायानिर्णयाची तारीख | : | २२.०६.२०२६ |
| न्यायानिर्णय काय | : | दोषी धरण्यात आले. |

**आरोपीची माहितीः**–

| **आरोपीचे नाव** | **आरोपीस अटक केल्याची तारीख** | **आरोपीस जामिनावर सोडल्याची तारीख** | **दोषारोप कलम** | **शिक्षा किंवा निर्दोष मुक्तता** | **शिक्षा काय** | **खटला चालु असतांना आरोपी जेलमध्ये असल्याचा कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|
| सुरेश शांताराम शिंदे | – | १६.०१.२०२० | १३८ परक्राम्य लेख अधिनियम | शिक्षा | अंतिम आदेशाप्रमाणे | नाही. |

**न्यायनिर्णय**

(दिनांक २२.०६.२०२६ रोजी अधिघोषीत)

आरोपीविरूध्द परक्राम्य लेख अधिनियम कलम १३८ प्रमाणे दोषारोप ठेवून खटला चालविण्यात आला.

२. **फिर्यादीचे थोडक्यात कथन की –**

आरोपीचा तरडगांव येथे भैरवनाथ कृषी सेवा केंद्र नावाचा बि–बियाणे, खते विक्रीचा व्यवसाय आहे, आरोपीचे व फिर्यादीचे मैत्रीचे व स्नेहांचे संबंध आहेत, ऑगस्ट २०१४ मध्ये आरोपीच्या व्यवसायास भांडवलाची गरज निर्माण झालेमुळे आरोपीने ऑगस्ट २०१४ मध्ये त्यांच्याकडे पैशाची मागणी केली, फिर्यादीचे आरोपीबरोबर असलेले मैत्रीचे संबंधामुळे त्यांनी ऑगस्ट २०१४ मध्ये आरोपीने मागितलेल्या रकमेची मागणी पूर्ण केली, त्यानंतर आरोपीने फिर्यादीकडून ऑगस्ट २०१६ पर्यंत वेळोवेळी रु.५,६०,०००/– एवढी रक्कम उसनवार स्वरुपात घेतली, आरोपीने त्यांचेकडून वेळोवेळी घेतलेल्या रक्कमेची मागणी जून २०१८ मध्ये आरोपीकडे केल्यानंतर आरोपीने सदरची संपूर्ण रक्कम सप्टेंबर मध्ये देतो असे आश्वासन दिले, त्यानंतर सप्टेंबर २०१८ मध्ये त्यांनी रकमेची मागणी केली असता सदरची रक्कम रु.५,६०,०००/– परत देणेच्या उद्देशाने आरोपीने त्यांना दि.०५.०९.२०१८ रोजी त्याचे खाते असलेले बँक ऑफ महाराष्ट्र शाखा तरडगांव या बँकेचा धनादेश क्रं.०००८३७ या क्रमांकाचा धनादेश दिला व सदरचा धनादेश नक्की वटेल अशी खात्री व विश्वास दिला, फिर्यादीने त्यांचे खाते असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र शाखा तरडगाव या शाखेत दि.०५.०९.२०१८ रोजी भरला असता सदरचा धनादेश आरोपीचे खातेवर पुरेशी रक्कम जमा नाही, या कारणास्तव चेक रिटर्न मेमो वरील कारण मेमो नं.०७ (इनसफिशिएंट फंडस्) या कारणास्तव दि.२१.०९.२०१८ रोजी परत आला.

३. फिर्यादीचे पुढे असे कथन आहे की, त्याबाबत फिर्यादीने आरोपीची वैयक्तीक भेट घेऊन विचारणा केली असता आरोपी म्हणाला की, "माझ्याकडून तुम्हास देणे असलेल्या रक्कमेची तजवीज झालेली नाही. त्यामुळे खात्यावर पुरेशी रक्कम ठेवू शकलो नाही. तरी तुम्ही सदरचा धनादेश

दि.२४.०९.२०१८ रोजी बँकेत भरा सदरचा धनादेश नक्की वटेल'' त्याप्रमाणे त्यांनी सदरचा धनादेश वरील बँकेत दि.२४.०९.२०१८ रोजी जमा केला असता दरम्यान आरोपीने त्याचे बँकेस आरोपीचे खात्यावरील रक्कम कोणासही देवू नये असे कळविलेमुळे सदरचा धनादेश दि.२४.०९.२०१८ रोजी कारण क्रमांक १६ (Payment stopped by the drawer) असा शेरा मारुन परत आला, आरोपीने त्यांना दिलेला चेक न वटता परत आल्याचे त्यांना समजताच त्यांनी वकीलामार्फत आरोपी यांना त्यांचे पत्त्यावर दि.०६.१०.२०१८ रोजी रजि. नोटीस पाठवून चेक न वटता परत आल्याचे कळविले व चेकच्या रकमेची मागणी केली. वास्तविक दि.०६.१०.२०१८ रोजीच ते आरोपीस नोटीस पाठविणेचे उद्देशाने पोष्टामध्ये गेले असता त्या दिवशी शनिवार असल्याने पोष्टाने आर.पी.ए.डी.घेणे लवकर बंद केले होते, त्यानंतर रविवार असल्यामुळे त्यांनी सदरची नोटीस सोमवार दि.०८.१०.२०१८ रोजी आरोपीस पाठविली. सदरची नोटीस आरोपीस दि.१०.१०.२०१८ रोजी मिळाली. सदर नोटीस मिळूनही आरोपीने नोटीसमधील नमुद मुदतीत त्यांचेकडे सदर चेकची रक्कम जमा केली नाही. यावरुन आरोपीचा त्यांना दिलेल्या चेकबाबतची वागणुक व हेतु लबाडीचा व फसवणूकीचा होता अशी त्यांची खात्री झाली आहे. त्यामुळे, फिर्यादीने आरोपीविरुध्द सदरची फिर्याद दाखल केली आहे.

४. माझे पुर्वाधिकारी यांनी फिर्यादीचे प्रतिज्ञालेख नोंदवुन आरोपीविरूध्द दिनांक ०२.०८.२०१९ रोजी परक्राम्य लेख अधिनियम १८८१ चे कलम १३८ अन्वये समन्स काढण्याचे आदेश दिले. आरोपी दिनांक १६.०१.२०२० रोजी हजर झाला व माझे पुर्वाधिकारी यांनी आरोपीविरूध्द दि.१६.०१.२०२० रोजी प्रतिकथन नि.१७ नोंदविला. तो आरोपीस त्याच्या मातृभाषेत वाचुन व समजावून सांगण्यात आला. आरोपीने गुन्हा नाकबुल केल्याने सदर केस पुढे चालविण्यात आली.

५. माझे पूर्वाधिकारी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) नुसार नि.क्र.५२ प्रमाणे आरोपीचे निवेदन नोंदविले. त्यामध्ये आरोपीने फिर्यादीचा खाजगी सावकारीचा व्यवसाय आहे, फिर्यादीवर ग्रुप केस झाली होती त्यामध्ये आरोपीचे नांव होते त्यामुळे फिर्यादीने त्यांच्याविरुध्द खोटी केस केली आहे असा बचाव घेतला आहे.

६. फिर्यादीतर्फे विद्वान वकील श्री.आर.ए.यादव व आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.जे.एम.मेटकरी यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. फिर्यादी त्यांचे कथनाप्रित्यर्थ मा.सर्वोच्च न्यायालय, भारत यांचेकडील **Sanjabij Tari V. Kishore S. Borcar and Anr., 2026 (1) ABR (Cri) 1** या न्यायनिवाडयावर विसंबून राहिले आहेत. आरोपी त्यांचे कथनाप्रित्यर्थ मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील **Criminal Revision Application No.394/2015 between Mrs. Munica Sunit Ujjain Vs. Sanju M. Menan & Ors.** या न्यायनिवाडयावर विसंबून राहिले आहेत. वर नमूद दोन्ही न्यायनिवाडयातील न्यायतत्वे मी विचारात घेतली आहेत.

७. समोर आलेला लेखी व कागदोपत्री पुरावा यांचा सर्वकष विचार केल्यावर खालील मुद्दे उपस्थित होतात. त्या मुद्दयावर मी नोंदविलले निष्कर्ष कारणासहित खालीलप्रमाणे नमुद केलेला आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | आरोपीने सदर कायद्या अंतर्गत फिर्यादीच्या बाजुने असलेले सदर गृहितके खोडून काढली आहेत काय? | **..नाही..** |
| **२.** | फिर्यादीने हे सिध्द केले आहे काय की, धनादेश अनादरीत झाल्यानंतर आरोपीला त्याने विहित मुदतीत नोटीस पाठवुन धनादेशातील रक्कमेची मागणी केली व नोटीस मिळूनही आरोपीने सदर रक्कमेची परतफेड केली नाही? | **..होय..** |
| **३.** | आरोपीने सदर कायदा, कलम १३८ अंतर्गत गुन्हा केलेला आहे काय? | **..होय..** |
| **४.** | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमीमांसा

८. फिर्यादी पक्षाने आरोपीविरुध्दचे आरोप सिध्द करण्यासाठी खालीलप्रमाणे साक्षीदार तपासले आहेतः-

| **सा.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **निशाणी क्रमांक** | **साक्षीदाराचा प्रकार** |
|---|---|---|---|
| १. | विजयराव नामदेव गायकवाड | २३ | फिर्यादी |

९. आरोपीतर्फे तपासण्यात आलेले साक्षीदारः-

| **अ.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदाराचा प्रकार** |
|---|---|---|
| | **काही नाही** | |

१०. न्यायालयामार्फत तपासण्यात आलेले साक्षीदारः-

| **अ.क्र.** | **साक्षीदाराचे नाव** | **साक्षीदाराचा प्रकार** |
|---|---|---|
| | **काही नाही** | |

११. फिर्यादी पक्षाने आरोपीविरुध्दचे दोष सिध्द करण्याकरीता खालील कागदपत्रांवर आपली भिस्त ठेवली आहे.

| **अ. क्र.** | **निशाणी क्रमांक** | **कागदपत्राचे विवरण** | **कोणी शाबित/सिध्द केले** |
|---|---|---|---|
| १. | ३० | वादातीत धनादेश | फिर्यादी |
| २. | ३१ व ३२ | चेक रिटर्न मेमो | फिर्यादी |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | ३३ | आर.पी.ए.डी. पावती | फिर्यादी |
| ४. | ३४ | नोटीस पोहोच पावती | फिर्यादी |
| ५. | ४३ | नोटीस स्थळप्रत | फिर्यादी |
| ६. | ५९/१ | बँक ऑफ महाराष्ट्रचे फिर्यादीचे अकाऊंट स्टेटमेंट प्रत | फिर्यादीने दाखल केले. |

१२. आरोपीचे विद्वान विधीज्ञ यांनी साक्षीदारांच्या उलटतपासात सिध्द झालेली/निशाणी क्रमांक देण्यात आलेली कागदपत्रेः–

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **कागदपत्राचे विवरण** |
|---|---|---|
| **काही नाही** | | |

१३. फिर्यादिने नि.५३ नुसार त्यांचा पुरावा संपल्याची पुरसीस दाखल केली आहे.

**दोन्ही पक्षांना मान्य असलेली परिस्थीती :–**

१४. वादातीत धनादेश हा आरोपीच्या खात्यातील आहे. त्यावर आरोपीची सही आहे. फिर्यादी व आरोपी एकाच गावात राहायला आहे. गावातील १० ते १५ लोकांनी फिर्यादी व त्यांच्या दोन भावांविरुध्द सावकारकीचा गुन्हा दाखल केला होता. फिर्यादीने शामकांत सस्ते, रा. निरगुडे, तात्यासोबत सुरवसे, रा.तरडगांव यांच्याविरुध्द धनादेश अनादरीत झाल्याबाबत प्रकरण दाखल केले होते. आरोपीचा भैरवनाथ कृषी सेवा केंद्र या नावाने खते विक्रीचा व्यवसाय आहे.

**मुद्दा क्र.१ करीता :–**

१५. फिर्यादीने त्याच्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात फिर्यादीतील कथनांची पुनरावृत्ती केलेली आहे. फिर्यादीच्या सरतपासामध्ये वादातीत धनादेश नि.३०, चेक रिटर्न मेमो नि.३० व ३२, नोटीस नि.४३, नोटीस पाठविल्याची संगणक पोस्टाची पावती नि.४३, नोटीस आरोपीला मिळाल्याची पोहोच पावती नि.३४, ही कागदपत्रे शाबित झालेली आहेत.

१६. या खटल्यात आरोपीला धनादेशावरील सही मान्य आहे. त्यामुळे परक्राम्य लेख अधिनियम कलम १३९ व ११८ ची गृहितके आकर्षित करणेस फिर्यादी यशस्वी झालेला आहे. आरोपीने घेतलेल्या बचावानुसार सदर खटला फिर्यादीने खोटा दाखल केलेला आहे. हे सिध्द करण्याची जबाबदारी कलम १०३ भारतीय पुरावा कायदा, १८७२ नुसार आरोपीची आहे. तसेच मा.नामदार सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिवाडा **रंगप्पा वि. श्री मोहन (2010 ALL SCR 1349)** या निर्णयानुसार मा. नामदार सर्वोच्च न्यायालयाने म्हटल्यानुसार आरोपीवर त्याने मांडलेला बचाव सिध्द करणे बंधनकारक आहे.

१७. आरोपीने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१)(ब) मधील निवेदनात फिर्यादीचा खजगी सावकारीचा व्यवसाय आहे, फिर्यादीवर ग्रुप केस झाली होती, त्यामध्ये त्यांचे नांव

होते. त्यामुळे फिर्यादीने त्यांच्याविरुध्द खोटी केस केली आहे असा बचाव घेतला आहे. तसेच, फिर्यादीच्या उलटतपासावरुन आरोपीचा बचाव असा दिसून येतो की, वादातीत धनादेश हा आरोपीने सुरुवातीला फिर्यादीकडून रक्कम रु.१,००,०००/– घेतले होते त्याच्या सुरक्षिततेपोटी दिला होता. बचावासाठी आरोपीने व्यवहारासंदर्भात साक्षीदार तपासलेला नाही. धनादेश आरोपीने त्याच्याच खात्याचा दिला होता हे स्पष्टपणे मान्य असल्यामुळे त्याचा बचाव सिध्द करण्याची जबाबदारी आरोपीवर आहे.

१८. आरोपीने वरीलप्रमाणे बचाव घेतलेला आहे. त्यानुसार फिर्यादीचा उलटतपास घेण्यात आला आहे. फिर्यादीने त्याच्या उलटतपासात धनादेश अनादरीत झाल्याबाबत सदर प्रकरणासहीत त्यांनी फलटण न्यायालयामध्ये दोन प्रकरणे दाखल केली आहेत. त्या प्रकरणामध्ये त्यांची निर्दोष मुक्तता झाली आहे. ऑगस्ट २०१४ मध्ये कुठल्या तारखेला आरोपीने पैशांची मागणी केली होती, ऑगस्ट २०१४ ते ऑगस्ट २०१६ पर्यंत आरोपीला कुठल्या तारखांना वेळोवेळी रु.५,६०,०००/– देण्यात आले होते हे त्यांना सांगता येणार नाही. तसेच, आरोपीला सदरहू रक्कमेपैकी काही रक्कम त्यांनी रोख स्वरुपात दिली होती व काही रक्कम चेकद्वारे किंवा बँक ट्रान्सफर किंवा विथड्रॉवलद्वारे दिली होती असे कथन केले आहे. आरोपीला किती रक्कम त्यांनी चेकद्वारे दिली किंवा बँक ट्रान्सफर किंवा विथड्रॉवलद्वारे दिली होती हे त्यांना आठवत नाही. आरोपीला रक्कम रु.५,६०,०००/– दिली होती हे दर्शविण्याकरीता कुठलाही कागदोपत्री पुरावा त्यांनी जोडलेला नाही, हे मान्य केले आहे. त्यांचा शेतीचा व्यवसाय आहे, त्यांच्या नांवे ५ एकर शेती आहे, ते ऊस, बाजरी व ज्वारीचे उत्पन्न घेतात, त्यांचे वार्षिक उत्पन्न किती हे त्यांना सांगता येणार नाही, आरोपी सप्टेंबर २०१८ मध्ये रक्कम कोठून आणून देणार होता याबाबत त्यांना माहिती नाही, आरोपी रक्कम कोठून आणणार याबाबत त्यांनी आरोपीला विचारणा केली नव्हती, हे मान्य केले आहे व इतर उत्तरसुचक प्रश्नांना त्यांनी नाकारले आहे.

१९. आरोपीतर्फे फिर्यादीला उलटतपासामध्ये प्रश्न विचारण्यात आले होते की, आरोपीने फिर्यादीच्या महाराष्ट्र बँकेच्या खात्यावर एकदा रु.९०,०००/–, एकदा रु.४०,०००/– व शेवटी रु.१,००,०००/– भरले होते, आरोपीला सुरुवातीला रक्कम रु.१,००,०००/– दिली होती त्यावेळी आरोपीकडून सुरक्षिततेपोटी कोरा धनादेश घेतला होता, आरोपीने त्यांच्याकडून व्याजाने रक्कम रु.१,००,०००/– घेतले होते व त्याच्याकरीता आरोपीने त्यांना रक्कम रु.२,३०,०००/– दिले होते या प्रश्नांना फिर्यादीने नाकारलेले आहे. या प्रश्नांवरुन असे दिसून येते की, आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये पैसे देवाण घेवाणीचा व्यवहार झाला होता. अन्यथा आरोपीने फिर्यादीच्या खात्यावर पैसे भरण्याचे कोणतेही कारण नाही.

२०. फिर्यादीने नि.५९ यादीलगत त्याचे बँक ऑफ महाराष्ट्रचे अकाऊंट स्टेटमेंट दि.१३.११.२०१४ ते दि.०७.०५.२०१६ पावेतोचे दाखल केलेले आहे. त्याचे अवलोकन केले असता दि.१७.११.२०१४ रोजी रक्कम रु.१,००,०००/– चेक क्र.४८२५ द्वारे आरोपीच्या नांवे दिल्याची नोंद आहे. तसेच, दि.१६.१०.२०१४ रोजी आरोपीच्या नांवे रु.४५,०००/– चेक क्र.४८२४ द्वारे, दि.११.०९.२०१५ रोजी आरोपीच्या नांवे रु.२५,०००/– चेक क्र.८१६५ द्वारे, दि.१५.०९.२०२५ रोजी आरोपीच्या नांवे रु.१०,०००/– चेक क्र.८१६६ द्वारे,

दि.३०.०४.२०१६ रोजी आरोपीच्या नांवे रु.२०,०००/– चेक क्र.११८७५ द्वारे, दि.०४.०५.२०१६ रोजी आरोपीच्या नांवे रु.४०,०००/– चेक क्र.११८७६ द्वारे दिल्याच्या नोंदी दिसून येतात. त्या अनुषंगाने एकुण रक्कम रु.२,४०,०००/– फिर्यादीने आरोपीस चेकद्वारे दिल्याचे स्पष्ट होते.

२१. रक्कम रु.५,६०,०००/– संदर्भात वादातीत धनादेश दि.०५.०९.२०१८ रोजी दिलेला दिसून येतो. परंतू, रक्कम रु.३,२०,०००/– इतकी रक्कम फिर्यादीने आरोपीला दिल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यासंदर्भात फिर्यादीने उलटतपासामध्ये आरोपीला काही रक्कम रोख स्वरुपात किंवा बँक विथड्रॉवलद्वारे दिली हे जरी गृहीत धरले तरी फिर्यादीतर्फे दाखल नि.५९ यादीलगत दाखल अकाऊंट स्टेटमेंटवरुन ती बाब स्पष्ट होत नाही. तसेच दि.०५.०९.२०१८ रोजी आरोपीकडून फिर्यादीस रक्कम रु.५,६०,०००/– इतकी रक्कम येणे बाकी होती. त्यासंदर्भात फिर्यादीने त्याच्या अकाऊंट स्टेटमेंट व्यतिरिक्त कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. आरोपीला वादातीत धनादेश त्याच्या खात्यातला असल्याचे व त्यावर त्याची सही असल्याचे मान्य असल्यामुळे सदर धनादेश कोणत्याही कायदेशीर दायित्वासाठी दिला नसल्याचे आरोपीने शाबित करणे गरजेचे आहे. कलम १३९ या गृहीतकाचे खंडन करण्यासाठी आरोपीने मान्य करण्याजोगा पुरावा द्यावा लागतो. आरोपीने बचावाप्रित्यर्थ स्वतःला अगर साक्षीदाराला तपासले नाही. तसेच, आरोपी फिर्यादीचे रक्कम रु.५,६०,०००/– देणे लागत नव्हता. तर वादातीत धनादेश हा रक्कम रु.५,६०,०००/– चा फिर्यादीच्या लाभात का दिला याचे कारण अगर खुलासा आरोपीने केलेला नाही. तसेच, आरोपीने फिर्यादीकडून घेतलेली रक्कम फिर्यादीला परत केलेली आहे अगर तो रक्कम रु.५,६०,०००/– देणे लागत नाही त्यासंदर्भात आरोपीने कोणताही कागदोपत्री पुरावा का दाखल केलेला नाही. या व्यतिरिक्त सदर बचावाच्या अनुषंगाने कोणतीही व्यक्ती कारणाशिवाय सही केलेला धनादेश कोणाला का देईल या संदर्भात आरोपीने सुरक्षिततेपोटी धनादेश दिल्याचे कथन केले आहे. थोड्या क्षणासाठी असे जरी गृहीत धरले की, आरोपीचा सही केलेला धनादेश फिर्यादीला त्याने दिला, त्याचा गैरवापर होवू शकतो अशा आशयाची तक्रार आरोपीने बँकेला का दिली नाही, तसेच, त्याने धनादेशाचा गैरवापर होवू शकतो याची जाणीव असताना न्यायालयात दाददेखील मागितली नाही. अगर पोलीस ठाणेला तक्रार का नोंदविली नाही तसेच आरोपीने फिर्यादीला नोटीस पाठवून सदर धनादेशाची मागणी का केली नाही याचे कोणतेही संयुक्तिक कारण अभिलेखावर आरोपीतर्फे आणलेले नाही. याव्यतिरिक्त नि....... वरील धनादेश पहिल्यांदा फिर्यादीने दि.०५.०९.२०१८ रोजी टाकल्यानंतर तो धनादेश आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम नाही म्हणून दि.२१.०९.२०१८ रोजी नि.३१ रिटर्न मेमोने परत आला. त्यानंतर पुन्हा दि.२४.०९.२०१८ रोजी फिर्यादीने तो धनादेश त्यांच्या खात्यात टाकला असता Payment stopped by the drawer या कारणास्तव न वटता परत आल्याचे नि.३२ रिटर्न मेमोवरुन दिसून येते. यावरुनदेखील आरोपीविरुध्द अनुमान काढता येतो आणि वादातीत धनादेश आरोपीने फिर्यादीस कायदेशीर दायित्वासाठी दिला होता असे निदर्शनास येते. त्यामुळे, आरोपीने घेतलेला बचाव संशयास्पद वाटत आहे. म्हणुन वर नमूद कारणे, विवेचन, फिर्यादीचा तोंडी पुरावा व कागदोपत्री पुराव्यावरुन फिर्यादीच्या बाजुने असलेले गृहितके खोडून काढण्यास आरोपी अयशस्वी झाले आहेत. म्हणून, मी मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष 'नाही' नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ करीता :–**

२२. फिर्यादीने नि.३० वरील धनादेश हा दि.०५.०९.२०१८ रोजी त्यांचे खाते असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र शाखा तरडगांव या बँकेत वटणावळीसाठी भरला होता. तो धनादेश दि.२१.०९.२०१८ रोजी चेक रिटर्न मेमो नि.३१ नुसार आरोपीच्या खात्यात पुरेशी रक्कम शिल्लक नाही "Funds Insufficient" या कारणास्तव न वटता परत आल्याचे सिध्द केलेले आहे. तसेच, त्यानंतर फिर्यादीने पुन्हा नि.३० वरील धनादेश हा दि.२४.०९.२०१८ रोजी त्यांचे खाते असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र शाखा तरडगांव या बँकेत वटणावळीसाठी भरला असता दि.२४.०९.२०१८ रोजी चेक रिटर्न मेमो नि.३२ नुसार "Payment Stopped by drawer" या कारणास्तव न वटता परत आल्याचे सिध्द केलेले आहे. वादातीत धनादेश न वटता परत आल्यानंतर फिर्यादीने ३० दिवसांच्या आत आरोपीला दि.०६.१०.२०१८ रोजी नि.४३ नुसार त्यांचे विधीज्ञामार्फत नोटीस रजिस्टर पोस्टाने पावती नि.३३ नुसार पाठविली. आरोपीने त्याच्या फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ चे निवेदनात नोटीस मिळाल्याचे नाकारले आहे. नोटीसवर, पोस्टाची पोहोच पावती नि.३४ वर फिर्यादीतील नमूद पत्यावर आरोपीस नोटीस पाठविल्याचे दिसून येते. याव्यतिरिक्त आरोपीस फिर्यादीतील पत्यावरच समन्सची बजावणी झाल्याचे दिसून येते. परंतू, आरोपी गैरहजर राहिल्यामुळे त्यांच्याविरुध्द नि.७ वरील आदेशानुसार जामीनपात्र अधिपत्र फिर्यादीतील पत्यावरच जारी करण्यात आले. त्याची बजावणी झाल्यानंतर देखील आरोपी सदर प्रकरणात गैरहजर राहिला म्हणून त्यांचेविरुध्द अजामीनपात्र अधिपत्र माझे पूर्वाधिकारी यांनी जारी केले. त्यानंतर दि.१६.०१.२०२० रोजी आरोपीस अजामीनपात्र अधिपत्राची बजावणी होवून न्यायालयात संबंधित पोलीसांनी हजर केले होते. नि.१२ अन्वये त्यांचे विधीज्ञांनी वकीलपत्र दाखल केले. त्यामध्ये त्यांनी आरोपीचा पत्ता तरडगांव, ता. फलटण असा नमूद केलेला आहे. या सर्व कारणास्तव आरोपीला फिर्यादीने पाठविलेली नोटीस मिळाली नाही हा बचाव ग्राह्य धरता येणार नाही. तसेच, फिर्यादीने नि.३४ वरील पोस्टाची पोहोचपावती नुसार आरोपीला नोटीस मिळाल्याचे सिध्द केले आहे. नोटीस मिळूनही आरोपीने फिर्यादीला नोटीस मिळाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीत धनादेशावरील रक्कम फिर्यादीकडे जमा केली नाही, ही बाबदेखील फिर्यादीच्या पुराव्यावरुन सिध्द होत आहे. या उपरोक्त फिर्यादीस सदर खटला दाखल करण्यासाठी ६ दिवसांचा विलंब झाला तो माफ होवून मिळण्यासाठी उशीर माफी अर्ज क्र.५२३/२०१८ हा दि.३०.११.२०१८ रोजी दाखल केलेला होता. तो अर्ज माझे पूर्वाधिकारी यांनी दि.०८.०७.२०१९ रोजी खर्च लादून मंजूर केला होता. त्यानंतर प्रस्तुत खटल्यास क्रमांक पडला. म्हणून मी मुद्दा क्र.२ चे निष्कर्ष 'होय' नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.३ करीता :–**

२३. मुद्दा क्र. १ व २ मध्ये वादातीत धनादेश हा आरोपीने फिर्यादीस कायदेशीर देणे देण्याकरीता दिला नव्हता हे आरोपीने शाबित केले नाही. आरोपीने फिर्यादीला लाभात असलेली गृहीतके खोडून काढलेली नाहीत. धनादेश हा फिर्यादीने विहीत मुदतीत त्याच्या खात्यात वटण्याकामी टाकला होता व तो पहिल्यांदा Funds Insufficient व दुसऱ्यांदा Payment Stopped by drawer रिटर्न मेमो नि.३१ नुसार परत आल्यानंतर विहीत मुदतीत आरोपीस रजिस्टर पोस्टाने त्यांचे विधीज्ञामार्फत नि.४३ वरील नोटीस पाठविली होती. परंतू, आरोपीने नोटीस मिळूनही मुदतीत धनादेशाची रक्कम फिर्यादीस आणून दिली नाही, हे फिर्यादीने सिध्द केले आहे म्हणून आरोपीने सदर कायद्याअंतर्गत कलम १३८ अन्वये गुन्हा केला, हे सिद्ध झाले आहे. त्यामुळे

मी आरोपीस परक्राम्य लेख अधिनियम १८८१, कलम १३८ अंतर्गत दोषी धरत आहे. म्हणून, मी मुद्दा क्र.३ चे निष्कर्ष 'होय' नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.४ करीता :-**

२४. परक्राम्य लेख अधिनियम कलम १३८ च्या नमूद तरतूदीप्रमाणे आरोपीस २ वर्षापर्यंत तुरुंगवास, धनादेशाच्या रक्कमेच्या दुप्पट रक्कम देण्याची व दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे. म्हणून आरोपीला देण्यात येणाऱ्या शिक्षेविषयी त्यांचे म्हणणे ऐकणे आवश्यक आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, समन्सची बजावणी झाल्यानंतर आरोपी गैरहजर राहिले म्हणून त्यांचेविरुध्द जामीनपात्र अधिपत्र काढले. जामीनपात्र अधिपत्राची बजावणी झाल्यानंतरदेखील आरोपी गैरहजर राहिले म्हणून नि.१० वरील आदेशानुसार त्यांचेविरुध्द अजामीनपात्र अधिपत्र जारी केले. त्यानंतर दि.१६.०१.२०२० रोजी नि.१२ अन्वये आरोपी त्यांचे विधीज्ञामार्फत हजर झालेले आहेत. त्यानंतर माझे पूर्वाधिकारी यांनी आरोपीचे प्रतिकथन नि.१७ अन्वये दि.१६.०१.२०२० रोजी नोंदविले आहे. फिर्यादीने दि.१७.१२.२०२१ रोजी त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दिल्यानंतर आरोपीस दि.११.०६.२०२४ पर्यंत उलटतपासाची संधी दिलेली होती. परंतू, फिर्यादीचा उलटतपास घेणेस असमर्थ ठरले म्हणून माझे पूर्वाधिकारी यांनी आरोपीविरुध्द उलटतपास नाहीचा आदेश केलेला आहे. त्यानंतर नि.४७ वरील आदेशानुसार आरोपीस फिर्यादीचा उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात आली. फिर्यादीला उलटतपास दि.१३.०८.२०२४ रोजी पूर्ण झाला. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अंतर्गत नि.५२ अन्वये जबाबामध्ये आरोपीस शपथेवर साक्ष द्यायची आहे असे कथन केले आहेत.

२५. दि.२१.०९.२०१८ पासुन ते आरोपीस नोटीस मिळेपर्यंत तसेच नोटीस मिळाल्यानंतर फिर्याद दाखल करेपर्यंत, फिर्याद दाखल केल्यानंतर ते खटला प्रलंबित असताना आरोपीस धनादेशातील रक्कम फिर्यादीस परत देण्याची संधी होती.

२६. आरोपीस शिक्षेसंदर्भात कलम १३८ प्रमाणे न्यायालयात अधिकार दिलेले आहेत. सदर तरतुदीनुसार आरोपीस २ वर्षे कारावास किंवा धनादेशाच्या रकमेच्या दुप्पट रक्कम देण्याची दंडाची शिक्षा किंवा दोन्हीही शिक्षा न्यायालय देऊ शकते. फिर्यादीचे व आरोपीचे विधीज्ञ आजरोजी हजर आहेत. आरोपी गैरहजर आहे. फिर्यादी व आरोपीचे शिक्षेविषयी त्यांचे काय म्हणणे आहे हे ऐकण्याकरीता मी येथे थांबत आहे.

JYOTI SHIVAM KHEDKAR GOYAL
Digitally signed by JYOTI SHIVAM KHEDKAR GOYAL
Date: 2026.06.22 16:01:26 +0530

**ठिकाण** : फलटण श्रीमती.जे.एस.खेडकर-गोयल,
**दिनांक** : २२.०६.२०२६ **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, फलटण.**

२७. फिर्यादीचे विधीज्ञ श्रीमती.एस.डी.निकम यांनी फिर्यादीने आरोपीस त्याचे व्यवसायास भांडवलाची गरज निर्माण झाल्यामुळे ऑगस्ट २०१४ पासुन ते ऑगस्ट २०१६ पर्यंत वेळोवेळी रु.५,६०,०००/- उसनवार स्वरुपात दिली. जून २०१८ पर्यंत आरोपीने रक्कम परत केली नाही.

शेवटी सप्टेंबर, २०१८ मध्ये वादातीत धनादेश फिर्यादीला दिला. तोदेखील पहिल्यांदा खात्यात पुरेशी रक्कम नाही म्हणून परत आला व नंतर आरोपीने पेमेंट स्टॉप केले म्हणून फिर्यादीला वादातीत धनादेशाची रक्कम मिळाली नाही. त्यानंतर नोटीस मिळूनही आरोपीने फिर्यादीस धनादेशातील रक्कम परत केली नाही. म्हणून फिर्यादीस प्रस्तुत खटला दाखल करावा लागला. फिर्यादीस सन २०१६ पासुन त्याने दिलेली उसनवार रक्कम आरोपीकडून २ वर्षापर्यंत मिळाली नाही. त्यानंतर खटला दाखल केल्यानंतर ते आजपावेतो आरोपीने ती रक्कम दिलेली नाही. त्यामुळे, फिर्यादीस आर्थिक त्रास सहन करावा लागला व न्यायालयीन खर्च करावा लागला. आरोपीविरुध्द अशा प्रकारच्या अजूनही केसेस दाखल आहेत. त्यामुळे, आरोपीस जास्तीत जास्त कारावासाची शिक्षा तसेच, चेक रक्कमेच्या दुप्पट रक्कमेची नुकसान भरपाई फिर्यादीस देण्यात यावी, आरोपीस शिक्षा दिल्यास त्याच्यावर कायद्याचा वचक राहील. पुन्हा अशा प्रकारचे गुन्हे तो करणार नाही म्हणून त्याला कारावासाची शिक्षा होणे आवश्यक आहे, अशी विनंती केली आहे.

२८. आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्रीमती.एस.ए.पटेल यांनी नमूद केले की, आरोपी हा त्याचे कुटुंबातील एकमेव कमावता आहे. त्याची आर्थिक परिस्थिती नाजूक आहे, आरोपीस कारावासाची शिक्षा दिल्यास त्याच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येईल, त्याला कारावासाची शिक्षा देण्यात येवू नये. तसेच, आरोपीस कमीत कमी दंडाची शिक्षा देण्यात यावी.

२९. सदर खटल्यातील वस्तुस्थिती व परिस्थीती पाहता फिर्यादी व आरोपी यांच्यामधील पैशाची देवाणघेवाण हातउसने स्वरूपाची होती. फिर्यादीला त्यामुळे केस प्रलंबित असतांना आर्थिक नुकसान झालेले आहे. आरोपी मागील ३ ते ४ तारखेपासून गैरहजर आहे. आरोपीविरुध्द नि.६६ वरील आदेशानुसार अजामीनपात्र अधिपत्र जारी करण्यात आले. त्याचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. तसेच, आरोपी तारखेस हजर रहात नाही. आजरोजीदेखील आरोपी गैरहजर आहे. या सर्व बाबी लक्षात घेता आरोपीला शिक्षेविषयी सहानुभूती दाखविण्याचे कोणतेही कारण मला दिसून येत नाही. तसेच, अपराधी परिविक्षा अधिनियम, १९५८ कलम ४ व ५ मधील तरतूदीनुसार आरोपी हे फायदा मिळण्यास पात्र नाहीत, असे माझे मत आहे. आरोपीला शिक्षा देतांना फिर्यादीचे आर्थिक नुकसान देखील विचारात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे धनादेशाची रक्कम, व्यवहाराची तारीख व बरोबरच मा. सर्वोच्च न्यायालयाने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३५७ खाली वेगवेगळया न्यायनिर्णयामध्ये जे मत व्यक्त केलेले आहे त्या बाबींचा विचार करता फिर्यादीला नुकसान भरपाई म्हणून धनादेशाची रक्कम, खटल्याकामी लागलेला खर्च, सदर रक्कम थकीत असल्यापासूनचा कालावधी लक्षात घेता फिर्यादी कंपनी धनादेश रक्कमेपेक्षा जास्त रक्कम नुकसान भरपाई म्हणून मिळण्यास पात्र आहे. त्याकामी रक्कम रू.७,५०,०००/– इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून द्यावे, हे मला न्यायोचित वाटते. तसेच वर नमुद विवेचन व कारणांवरून परक्राम्य लेख अधिनियम १८८९ चे कलम १३८ मधील तरतुदींचा हेतू लक्षात घेता आरोपीला कारावासाची शिक्षा देणे आवश्यक आहे. त्याकरीता आरोपीस ५ महिने सश्रम कारावासाची शिक्षा देणे न्यायोचित होईल असे मला वाटते. म्हणून, मी प्रश्न क्र.४ च्या निष्कर्षार्थ खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

# आदेश

१ आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(२) प्रमाणे परक्राम्य लेख अधिनियम कायदा कलम १३८ नुसार दंडनीय अपराधाकरीता दोषी ठरविण्यात आले आहे.

२ आरोपीस ५ महिने सश्रम कारावासाची शिक्षा व र.रु.७,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये सात लाख पन्नास हजार फक्त) इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे. द्रव्यदंडाची रक्कम न दिल्यास आरोपीस आणखी १ महिना साध्या कारावासाची शिक्षा सलग भोगावयाची आहे.

३ फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३५७ प्रमाणे फिर्यादीला रक्कम रू.७,५०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये सात लाख पन्नास हजार फक्त) इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून अपिल कालावधी संपल्यानंतर देण्यात यावी.

४ आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र ब जामीन कदबे जप्त करण्यात येत आहे.

५ आरोपी आजरोजी गैरहजर आहे. म्हणून आरोपीविरूध्द दोषी असल्याचे अधिपत्र (conviction warrant) जारी करण्यात येत आहे.

६ आरोपीस न्यायनिर्णयाची एक प्रमाणीत प्रत विनामुल्य देण्यात यावी.

( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात उद्घोषीत करण्यात आला.)

JYOTI SHIVAM KHEDKAR GOYAL

Digitally signed by JYOTI SHIVAM KHEDKAR GOYAL
Date: 2026.06.22 16:01:35 +0530

**ठिकाण** : फलटण

**दिनांक** : २२.०६.२०२६

श्रीमती.जे.एस.खेडकर-गोयल,

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, फलटण.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word for word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Shri. A. S. Bagal |
| Court Name | : | Smt. J. S. Khedkar-Goyal,<br>J.M.F.C., Phaltan |
| Judgment Date | : | 22.06.2026 |
| Judgment signed by Presiding Officer | : | 22.06.2026 |
| Judgment Uploaded On | : | 22.06.2026 |